माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**
**तक्रार क्रमांक : २०६/२०१६**

**तक्रारकर्ता, श्री.शेख अब्दुल खलील शेख मुस्तफा,**
**रा.प्रभात नगर, भोसा रोड, राजु किराणा जवळ, यवतमाळ, ता.जि.यवतमाळ**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**ग्रामपंचायत कार्यालय, भोसा/लोहारा/वडगांव/अकोला (बा.)/पिंपळगांव/उमरसरा/आसोला/आकपुरी, ता.जि.यवतमाळ**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, यवतमाळ, ता.जि.यवतमाळ**

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : १५.०६.२०२३**

| | | |
|---|---|---|
| **तक्रारकर्ता** | : | **उपस्थित** |
| **जन माहिती अधिकारी** | : | **उपस्थित** |
| **प्रथम अपिलीय अधिकारी** | : | **उपस्थित(प्रतिनिधी)** |

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्जाचा दिनांक |
|---|---|---|
| ०८.०९.२०१५ | -- | ०७.०५.२०१६ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र.२५७६/२०१२ दि.०८.०९.२०१५ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रारीवर दिनांक १५.०६.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी श्री.किशोर गोळे, सुनिल भाकरे व विलास उकलेंजवार उपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांचेतर्फे श्री.किशोर गोळे हे उपस्थित आहेत. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.एम.एस.कामडी उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसारआयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील (अपील क्र. २५७६/२०१२) मध्ये दिनांक ०८.०९.२०१५ रोजी सुनावणी घेवून " १.जन माहिती अधिकारी तथा सचिव, वडगांव , अकोला बाजार, आकपुरी, आसोला यांनी अर्जदार यांनी मुदतीत म्हणजे दि.२६.०९.२०१५ पावेतो अर्जदार यांना माहिती द्यावी. उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत लोहारा, भोसा, उमरसरा व पिंपळगांव यांनी त्यांना दप्तराचा प्रभार मिळण्यात १५ दिवसात अर्जदार यांना माहिती द्यावी. २. प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,



राज्य माहिती आयोग सत्यमेव जयते अमरावती विभाग, अमरावती

पं.स.यवतमाळ यांनी सचिव ग्रामपंचायत भोसा, पिंपळगांव, लोहारा व उमरसरा यांना शक्य तेवढया लवकर दप्तराचा प्रभार देण्यासाठी कार्यवाही करावी. या कार्यवाहीचा आढावा उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत जि.प.यवतमाळ यांनी घ्यावा व प्रभार हस्तांतरण करण्याची कार्यवाही लवकरात लवकर करावी. ३. वरील प्रमाणे आदेश देवून अर्जदार यांचे द्वितीय अपील दि.१९.०८.२०१२ निकाली काढण्यात येत आहे." असे आदेश पारित केले होते.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेला खुलासा व तक्रारकर्ता यांचे युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, तक्रारकर्ता श्री.शेख अब्दुल खलील शेख मुस्तफा यांनी तक्रार दाखल करुन, द्वितीय अपील क्र. २५७६/२०१२ यात दि. ०८.०९.२०१५ रोजी आयोगाने पारित केलेल्या आदेशाचे अनुपालन झाले नसल्याचे आक्षेप नोंदविले. तक्रारकर्ता श्री. शेख अब्दुल खलील शेख मुस्तफा यांनी दि.०७.०५.२०१६ रोजी सविस्तर तक्रार अर्ज दाखल केला असून त्यात विहीत मुदतीत कुठलीच माहिती मिळाली नसल्याचे तसेच या प्रकरणात महाराष्ट्र शासनाचे ग्राम विकास जलसंधारण विभागाचे दि.०३.०५.२०११ रोजीचे परिपत्रकाचे तसेच दि.०८.०६.२०१० रोजीच्या जारी करण्यात आलेल्या परिपत्रकाचे उल्लंघण झाले असल्याचे आक्षेप नोंदविला आहे. या प्रकरणी प्राधिकरणाने सादर केलेल्या खुलाश्यात, पारित केलेल्या आदेशाचे अनुषंगाने सचिव, ग्रामपंचायत अकोला बाजार व सचिव, ग्रामपंचायत असोला यांनी तक्रारकर्त्यास माहिती पुरविली असून सचिव, ग्रामपंचायत लोहारा, भोसा, पिंपळगांव यांनी माहिती पुरविली नसल्याचे नमुद केले आहे. तसेच उपरोक्त ग्रामपंचायतीचे दस्तावेज नगर परिषदेकडे हस्तांतरित झाले असल्यामुळे ग्रामपंचायत स्तरावरुन माहिती पुरविता आली नसल्याचे प्रतिसाद अपिलकर्त्यास तसेच आयोगास सादर करण्यात आलेला आहे. मात्र या प्रकरणी आयोगाने घेतलेल्या सुनावणीत संबंधीत ग्रामापंचायती यांचेकडून माहितीचे लवकरात लवकर प्रदान होणे तसेच प्रभार हस्तांतरण करण्याबाबतचे कार्यवाहीबाबतचे तपशील तक्रारकर्त्यास प्रदान करण्याविषयी याआधिच सुस्पष्टपणे नमुद केलेले आहे. दि.०३.०५.१०११ रोजी ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांचेवतीने जारी करण्यात आलेले परिपत्रक व दि.०८.०६.२०१० रोजी जारी करण्यात आलेले परिपत्रक हे अतिशय सुस्पष्ट असून ग्रामपंचायत स्तरावर माहिती अधिकार अधिनियमाचे परिणामकारक अंमजबजावणी तसेच ग्रामपंचायतीचे सचिव असलेल्या ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी यांनी माहिती देण्याबाबत जिल्हा परिषद स्तरावर घ्यावयाची दक्षता याबाबत अतिशय सुस्पष्ट सुचना निर्गमित करण्यात आली असून त्याची अंमलबजावणी करण्यात आली नसल्याच त्यात नमुद केले आहे. ही बाब लक्षात घेता, दि.०८.०९.२०१५ रोजी पारित आदेशाचे अनुपालन झाले नसल्याचे बाब लक्षात घेत, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द कलम १९ (८)(ग) व २०(१) अन्वये अधिकतम शास्ती कार्यवाही का करण्यात येवू नये? याचा स्वयंस्पष्ट खुलासा दोन आठवड्याच्या आत आयोगास सादर करण्यात यावा. वरील खुलाश्याची संधी ही नैसर्गीक न्यायतत्वाला अनुसरुन झालेल्या विलंबाची, आदेशाचे अुनपालन न करण्याची, खुलासा सादर करण्याची एक योग्य संधी देण्यात येत आहे. तसेच झालेल्या विलंबाबत कलम १९(८) (ख) अन्वये तक्रारकर्ता श्री.शेख अब्दुल खलील शेख मुस्तफा यांना नुकसान भरपाई का देण्यात येवू नये व ती नुकसान भरपाई संबंधीत कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात का करण्यात येवू नये याचाही खुलासा संबंधीत कर्मचाऱ्यांच्या वतीने करण्यात यावा. दरम्यान ज्या ग्रामपंचायतीने नगर परिषद झाला असल्याचा दावा केला त्यांनी त्यांचे अभिलेखात कलम २(च) नुसार उपलब्ध माहितीचे

तक्रारकर्त्यास प्रदान करावे अन्यथा त्यांचेकडील अभिलेख हा त्या ग्रामपंचायतींचे हस्तांतरण नगर पंचायत किंवा नगर परिषद मध्ये झाले असल्यामुळे तेथील अभिलेख प्राप्त करुन घेवून तक्रारकर्त्यास दोन आठवड्याच्या आत विनामुल्य माहिती प्रदान करावी.

**अंतरीम आदेश**

**उपरोक्त विवेचनाचे अनुषंगाने तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी स्वयंस्पष्ट खुलासा दोन आठवडयाच्या आत आयोगास सादर करावा. दरम्यानच्या काळात तक्रारकर्त्यास तत्काळ व विनाशुल्क माहिती प्रदान करुन माहिती प्रदान केल्याची पोच आयोगास सादर करावी.**

राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती — सत्यमेव जयते

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ अमरावती**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : १५.०६.२०२३**

जावक क्रमांक ८०८ दिनांक 03 JAN 2024